<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

**प्रेस नोट दि.०७/१०/१७**

**<u>दि.०६/१०/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९६७/१७,भादविक ३०२,२०१,३४ |
| **फिर्यादी** | कल्याणी शिंदे,म.पो.उप.निरि.हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | दोन इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०१७ रोजी दुपारी ते दि.०४/१०/२०१७ रोजी सकाळी ११/२० वा.चे दरम्यान गांधीन खिळा,सदाशिव नगर,फुरसुंगी ता.हवेली जि.पुणे.येथे कॅनॉल मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद दोन इसम व एक महिला यांनी आपसात संगनमत करून,माधुरी पवार ऊर्फ शेख,वय-२८,रा.भोसले व्हिलेज सर्व्हे नं.१७८,पर्वत सबुर काळखर यांचे बांधकाम साईटवर फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे हिस नमुद ठिकाणाहुन जबरदस्तीने रिक्षात बसवुन घेवुन जावुन तीस अज्ञात कारणावरुन मारहाण करुन,माधुरी पवार ऊर्फ शेख हिस जीवे ठार मारुन,तीची बॉडी पुरावा नष्ट करण्याच्या इरादयाने गांधीन खिळा मुठा उजवा नवीन कॅनॉलचे पाण्यामध्ये फुरसुंगी,पुणे येथे टाकुन दिले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे) अंजुम बागवान ९८२३०२१४०९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३९६/१७,भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | अल्ताफ शेख,वय-५५,रा.स.नं.३८/१/३,पोकळे मळा,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | १.सुद्दीन कुरेशी,वय-३५,रा.अदितांश सोसा.कोंढवा-खुर्द,पुणे २.रिवाज उर्फ युसुफ साबीर खान वय-३६,रा.सदर ३.महंमद मुदस्सर फैयाज अहमदपठाण,वय-३२ ४.जावेद हमीद ईनामदार, वय-४४,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/१०/१७ रोजी सकाळी ११/४५ वा.अदितांश सोसाटीचे खालील हमजा हेअर सलुन या दुकानाचे समोरच्या उघड्या जागेत कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे मित्र रफीक बाबु शेख हे आदितांश सोसायटीच्या वादामध्ये मध्यस्थी करतात या कारणावरुन फिर्यादी यांचा मुलगा ऐसर अल्ताफ शेख,वय-१८ हा दाढी करण्यासाठी बाहेर उभा असताना,सदर ठिकाणी त्या सोसायटीमध्ये रहाणारे नमुद इसमांनी ऐसर यास तुझा बाप कोठे आहे,तो आमचे सोसायटी मध्ये खुप मध्यस्थी करायला येतो,त्याला मस्ती आली आहे का अशी विचारणा करून त्यांना शिवीगळ केली. त्यानंतर सदर ठिकाणी फिर्यादी यांचा मोठा मुलगा आकीब अल्ताफ शेख,वय-२६ वर्षे हा आल्यानंतर त्यांचेत पुन्हा भांडणे झाली. फिर्यादी हे त्यांची भांडणे सोडविण्यास गेले असता,सदर इसमांनी फिर्यादी यांचे दोन्हीही मुलांना मारहाण करुन मुलगा ऐसर शेख याचे छातीवर चाकुने वार करुन,त्यानंतर आकीब यास हाताने धरून,चाकुने त्याचे छातीत खुपसुन,त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. मिलींद गायकवाड ८१०८३६९२९२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३८२/१७,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,मोव्हे.१८४, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | मुरलीधर खोकले,सहा.पो.निरी. विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | मोटार सायकलस्वार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/२०१७ रोजी ०३/४० वा.इनऑर्बिटचे समोर नगर-पुणे रोडवर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात सोमनाथनगरकडे घेवुन जात असताना,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे दुचाकीस धडक देवुन,त्यामध्ये सदर इसम हा स्वतः व त्याचे पाठीमागे बसलेला अंकित कुमार सिंह हा जखमी होवुन,फिर्यादी यांचा मित्र प्रतिक दिलीप हांडे,वय-२३,रा.स.नं.२४/८,मुंजाबा वस्ती,धानोरी,पुणे यास गंभीर जखमी करुन,प्रतिक हांडे याचे मृत्युस कारणीभुत होवुन,दोन्ही मोटर सायकलचे नुकसान करण्यास कारणीभुत झाला |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.आर.खोकले |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९६६/१७,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हे.१८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | दिपाली पाचांळ,वय-२४ वर्षे,रा.आनंदनगर केशवनगर,मुढंवा,पुणे |
| **आरोपी** | लाल रंगाचे मोटार सायकलवरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.०१/१०/२०१७ रोजी ०६/४५ वा.अथश्री सोसायटी समोरील रोडवर,हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांची मैत्रीण शितल विनायक जाधव,वय-२५,रा.स.नं.२९ के.आर.बी. वर्कशॉप,आनंदनगर,केशवनगर,मुढंवा,पुणे हिचेसह मोपेडवरून जात असताना,यातील लाल रंगाचे मोटार सायकलवरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमां कडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोपेडला जबर ठोस मारून,फिर्यादीस किरकोळ जखमी करून,शितल जाध हिस गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९५५२५९०३४७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ८५/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | समीर धुमाळ,वय-३२ वर्षे,रा.पोकळेनगर,शिवणे,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/१०/२०१७ रोजी दुपारी १२/३० वा.ते १६/३० वा.चे दरम्यान यशरिध्दी अपार्टमेंट,बी विंग,फ्लॅट नं.२०१,पोकळेनगर,शिवणे,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने ३,३३,५००/- रु किमतीचे घरफोडी चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे) कवीदास जांभळे ८३०८८११५४४ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३९८/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | तेरेसा नगरकर,वय-६०,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०९/१७ रोजी ०१/०० वा.सहानी सुजन पार्क वानवाडी,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांना फोन करुन त्यांना सरकारी बँकेतुन बोलत असल्याचे सागुन,फिर्यादी यांचे क्रेडिट कार्डची गोपनीय माहिती घेवुन ६०,०००/- रू ऑनलाईन ट्रान्झेक्शन करून नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. गायकवाड ९८९२२४८७६९ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९६८/१७,भादविक ३५३ |
| **फिर्यादी** | गणेश कांबळे,सहा.पो.फौज. स्वारगेट वाहतुक विभाग,पुणे शहर |

| | |
|---|---|
| **आरोपी** | सिलव्हर रंगाची जीप क्र.एमएच/१२/एफयु/५८४० हिचेवरील चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/१०/१७ रोजी ०६/४५ वा.अथश्री सोसायटी समोरील रोडवर हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचेसोबत पीएमपीएलचे कर्मचारी १.बापु म्हलारी लोखंडे २.अनिल संभाजी खेडकर ३.जब्बार भाई पटेल यांचेसह जीप घेवुन अवैद्य वाहतुक करणा-या वाहनांवर कारवाई करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,फिर्यादी यांनी यातील नमुद इसमाचे जीपवर अवैद्य प्रवासी वाहतुक केली म्हणुन कारवाई केल्याचा राग मनात धरून,त्याने पीएम पीएलचे कर्मचारी यांना मारहाण करुन शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी यांनी मध्यस्थी केली असता सदर चालकाने फिर्यादी यांचे हातातील प्रवाशांची यादी फाडुन,त्यांचेशी झटापट करुन,सरकारी गणवेशाला हात लावुन,फिर्यादी यांना अपशब्द वापरून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लोंढे ८९७५०२०५०० |

**दि.०६/१०/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता**

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड | भादविक ४५४,४५७,३८० | अतुल चंद्रकांत आमले | २२ |
| २ | कोंढवा | भादविक ३०४(अ) | हनुमंत लक्ष्मण झेंडे | ४६ |
| ३ | कोंढवा | भादविक ३०४(अ) | मंगेश अरूण लहाने | २९ |
| ४ | कोंढवा | भादविक ३०४(अ) | दिनेश ताराचंद निकम | २९ |
| ५ | कोंढवा | भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४ | अजहर रईसुद्दीन कुरेशी | ३५ |
| ६ | कोंढवा | भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४ | रिजवान साबीर खान | ३६ |
| ७ | कोंढवा | भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४ | महमद मुदस्सर अहमद पठाण | ३५ |
| ८ | कोंढवा | भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४ | जावेद हमीद ईनामदार | ४४ |
| ९ | बिबवेवाडी | भादविक ४२०,४०६,४६५,४६७,४६८,४७१ | प्रशांत विजयकुमार खेले | ४० |
| १० | बिबवेवाडी | भादविक ३८७,५०६ | अमोल काळु जोगदंड | २४ |
| ११ | भा.विद्यापीठ | भादविक ३९२,३४ | गुरूशांत जगन्नाथ शिलवंत | ३५ |
| १२ | डेक्कन | भादविक ३९२,३४ | सुनिल लक्ष्मण गवळी | २० |
| १३ | पिंपरी | भादविक ४२०,४०६,४६५,४६६,४६७,४६८,४७१,३४ | बाळु मारूती पवार | ३४ |
| १४ | पिंपरी | भादविक ४२०,४६८,४७१ | नागनाथ ईराप्पा कलकुरगे | ४३ |
| १५ | पिंपरी | भादविक ४२०,४६८,४७१ | देवेंद्र हनुमंत शिंगे | ३८ |
| १६ | पिंपरी | भादविक ४२०,४६८,४७१ | खाजाप्पा कल्लप्पा कांबळे | ३६ |
| १७ | पिंपरी | भादविक ३५४,४०६ | अनिल गोपीचंद तेहलवाणी | ४३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**